21 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### बी. एम. हिर्डेकर : शिवाजी विद्यापीठात बापूजी साळुंखे व्याख्यानमाला

# संस्थांनी विद्यार्थ्यांची कार्यसूत्री तयार करावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : २१ व्या शतकासमोरील शैक्षणिक आव्हाने पेलताना डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभे केलेले शैक्षणिक प्रयोग निश्चितपणे आपल्याला उपयोगी पडतील. आपण विद्यार्थ्यांची कार्यसूत्री तयार केली पाहिजे. त्यासह विद्यार्थ्यांना मागेल त्यावेळी मागेल त्या ठिकाणी शिक्षण पोहोचविले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत ते बोलत होते.



**शिवाजी विद्यापीठातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून यशोधन बोकील, विलास नांदवडेकर, अभयकुमार साळुंखे, सुमन बुवा उपस्थित होत्या.**

'२१व्या शतकातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, चीन, दक्षिण कोरिया, फिनलंड, इंग्लंड, अमेरिका यांच्या बरोबरीने भारतीय शिक्षण आव्हाने उभी करु शकते. कारण, या विकसित देशांमध्ये भारतातून गेलेले विद्यार्थीच आघाडीवर काम करीत आहेत. भारतीय विद्यापीठांमध्ये कार्यपद्धतीमध्ये योग्य ते क्रांतिकारक बदल करुन आपण हे आव्हान पेलू शकतो. याबद्दल परदेशांतील शिक्षणतज्ज्ञांना खात्री आहे. भारतातील शिक्षण पद्धतीबद्दल त्यांना आदर आहे. या सर्व गोष्टींचा दूरदर्शीपणे डॉ. बापूजी साळुंखे यांनी विचार केला होता, म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थेचे ब्रीदवाक्य 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' ठेवले होते. आज यात यापुढील पिढीतील प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण हा विचार जोडला आहे. या कार्यक्रमात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत केले. प्रा. यशोधन बोकील यांनी आभार मानले.

## बापूजींची दूरदृष्टी

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राचा शैक्षणिक आराखडा डॉ. बापूजी साळुंखे यांनी तयार केला. आपल्या स्वत:च्या विचाराने एक सामान्य शिक्षक ते शिक्षण संस्था असा राज्यभर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला. आज अनेक पदांवर विवेकानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थी वर्ग कार्यरत आहे. हीच बापूजी साळुंखे यांची दूरदृष्टी आहे, असे डॉ. हिर्डेकर यांनी सांगितले.